विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग , लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.०२०-२६१२२२१७, ई-मेल आय डी क्र- dydepune@gmail.com वेब साईट- www.dydepune.com

जा.क्र.उमाशि-४०३/११ वी ऑनलाईन/२०१७/ ५८३५
दिनांक - 21 AUG 2017

प्रति,

प्राचार्य, सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
वरिष्ठ सलग्न कनिष्ठ महाविद्यालये,
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र,
सर्व मार्गदर्शन केंद्र

**विषयः- इ. ११ वी केंद्रीय ऑनलाईन २०१७-१८ प्रवेशाबाबत पहिल्या विशेष फेरीनंतर च्या फे-यांच्या आयोजनाबाबत (प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (FCFS- First Come First Serve) बाबत**

संदर्भ:-१) शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-२०१५/(६१/१५)एसडी-२ दि.२८.०३.२०१६.
२) शासन निर्णय क्रमांक प्रवेश-२०१६/(१८०/१६)एसडी-२ दि.०७.१.२०१७.
३) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा पुणे यांचे पत्र जा.क्र. उच्च माध्य-२४१/११.प्रवेश/२०१७/२८८८ दि. २९.०६.२०१७
४) मा.कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र जा.क्र. प्रवेश-२०१७/प्र.क्र.१९७/एसडी-२ दि. १९.०८.२०१७.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, इ. ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया शासन निर्णयानुसार व मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म. रा. पुणे यांच्या संदर्भ क्र-३ च्या पत्रातील वेळापत्रकानुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज सुरु आहे.

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या नियमित चार व एक विशेष फेरी अशा एकूण ०५ फे-या झालेल्या आहेत. शासनाचे संदर्भ क्र-४ च्या पत्रानुसार पहिल्या विशेष फेरीनंतरच्या फे-यांचे आयोजन करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे प्रवेशाच्या संकेतस्थळावर वेळापत्रक व व्हिडिओ क्लिपद्वारे, व्हॉटस्‌अॅप ग्रुप प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (**FCFS- First Come First Serve**) अंतर्गत गुणवत्तेच्या गटाप्रमाणे या कार्यालयाने वेळोवेळी प्रसिध्दी निवेदनानुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील वर्तमान पत्रात याबाबत कळविण्यात आलेले आहे.

तरी आपणांस पुनश्च या पत्राद्वारे कळविण्यात येते की, विशेष फेरी नंतरच्या फे-यांचे वेळापत्रक यासोबत जोडलेले असून सदर वेळापत्रकानुसार आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारे अॅलॉट झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा व विद्यार्थी व पालकांना योग्य ते मार्गदर्शन आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातर्फे व मार्गदर्शन केंद्रातर्फे देण्यात यावी.

काही महाविद्यालय त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयात आलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून पत्र घेवुन आल्यानंतर अॅडमिशन देता येते असे विद्यार्थी व पालकांना माहिती देवून पाठवितात, ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. तरी आपल्याकडे आलेल्या पालक व विद्यार्थ्यांना या कार्यालयाकडे

पाठवू नये, इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया समजावून घेवून आपल्याकडे आलेल्या विद्यार्थी व पालकांना प्रवेशाबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी. याबाबत कोणतीही तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी.

सोबत वेळापत्रक :- **(प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (FCFS- First Come First Serve)**

**(दिनकर टेमकर)**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग,पुणे -१**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**
**१) मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे-१**
**२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे-१**
**३) मा. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२**

----

**उपरोक्त गटासाठी खालील प्रमाणे वेळापत्रक असेल.**

| अ.क्र. | दिनांक | वेळ | तपशिल |
|---|---|---|---|
| १ | २०.०८.२०१७ रविवार | सायंकाळी ५.०० वाजता | गट क्र-१ साठी रिक्त जागा संकेतस्थळावर जाहीर करणे |
| २ | २१.०८.२०१७ सोमवार | सकाळी १०.०० ते ५.०० | गट क्र-१ (४०० ते ५०० गुण) असलेले विद्यार्थी या फेरीमध्ये कार्यपध्दतीमध्ये दिल्याप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने आपला प्रवेश निश्चित करतील. |
| ३ | २१.०८.२०१७ (सोमवार) ते २२.०८.२०१७ (मंगळवार) | सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत व दि. २२.०८.१७ सकाळी १०.०० ते १.०० पर्यंत | ॲलोकेशन झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी वेळापत्रकाप्रमाणे त्याच दिवशी प्रत्यक्ष कॉलेजमध्ये जाऊन आपल्या ऑनलाईन प्रवेशाची पावती **(CGR- Computrized Genreted Recipt)** घेऊन प्रवेश निश्चित करतील. |
| ४ | २२.०८.२०१७ (मंगळवार) | सायंकाळी ५.०० वाजता | गट क्र-२ साठी रिक्त जागांचा तपशिल जाहिर करणे |
| ५ | २३.०८.२०१७ (बुधवार) | सकाळी १०.०० ते ५.०० वाजता | गट क्र-२ (३०० ते ५०० गुण) असलेले विद्यार्थी या फेरीमध्ये कार्यपध्दतीमध्ये दिल्याप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने आपला प्रवेश निश्चित करतील. |
| ६ | २३.०८.२०१७ (बुधवार) ते २४.०८.२०१७ (गुरुवार) | सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत व दि. २४.०८.१७ सकाळी १०.०० ते १.०० पर्यंत | ॲलोकेशन झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी वेळापत्रकाप्रमाणे त्याच दिवशी प्रत्यक्ष कॉलेजमध्ये जाऊन आपल्या ऑनलाईन प्रवेशाची पावती **(CGR- Computrized Genreted Recipt)** घेऊन प्रवेश निश्चित करतील. |
| ७ | २४.०८.२०१७ (मंगळवार) | सायंकाळी ५.०० वाजता | गट क्र-३ साठी रिक्त जागांचा तपशिल जाहिर करणे |
| ८ | २६.०८.२०१७ (शनिवार) व २८.०८.२०१७ (सोमवार) | सकाळी १०.०० ते ५.०० वाजता | गट क्र-३ (१७५ ते ५०० गुण) असलेले विद्यार्थी या फेरीमध्ये कार्यपध्दतीमध्ये दिल्याप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने आपला प्रवेश निश्चित करतील. |
| ९ | २८.०८.२०१७ (सोमवार) व २९.०८.२०१७ (मंगळवार) | सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत व दि. २८.०८.१७ सकाळी १०.०० ते ५.०० वाजेपर्यंत (०२ दिवस) | ॲलोकेशन झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी वेळापत्रकाप्रमाणे त्याच दिवशी प्रत्यक्ष कॉलेजमध्ये जाऊन आपल्या ऑनलाईन प्रवेशाची पावती **(CGR- Computrized Genreted Recipt)** घेऊन प्रवेश निश्चित करतील. |
| १० | ३०.०८.२०१७ | सायंकाळी ५.०० वाजता | सर्व रिक्त जागांचा तपशिल संकेतस्थळावर जाहिर केला जाईल. |